क्र.मुंमप्रविप्रा/बैठक/९७

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : १ मार्च, २०००.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक १४ फेब्रुवारी, २००० (सोमवार) रोजी झालेल्या ९७ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवीत आहे.

सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत काही हरकती असल्यास कृपया कळवाव्यात ही विनंती.

सचिव
कार्यकारी समिती

प्रति,
सर्व सदस्य,

निमंत्रित :
शासनाचे सचिव,
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

प्रत अग्रेषित :
विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्रा.,

प्राधिकरणाचे अधिकारी

Unit2:MTGFORM

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
## १७ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | १४ फेब्रुवारी, २००० (सोमवार) |
| वेळ | : | सायंकाळी ६.०० वाजता |
| सभास्थान | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालयातील समिती कक्ष, ६ वा मजला, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१. |

उपस्थित सदस्य :

| | |
|---|---|
| श्री.विलासराव देशमुख<br>मा.मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| श्री.सुनील तटकरे<br>नगर विकास राज्यमंत्री | सदस्य |
| श्री.हरेश्वर पाटील<br>मुंबईचे महापौर | सदस्य |
| श्री.प्रद्युमन उ. मेहता<br>विधानसभा सदस्य | सदस्य |
| श्री.सदानंद सरवणकर<br>अध्यक्ष, स्थायी समिती,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.रा.ता.कदम<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.दिगंबर कांडरकर<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |

| | |
|---|---|
| श्री.विजय म.दारुवाले<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.अरुण बोंगिरवार<br>शासनाचे मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |
| श्री.के.नलिनाक्षन<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| डॉ.सुरेश जोशी<br>शासनाचे प्रधान सचिव,<br>नगर विकास विभाग | सदस्य |
| श्री.विश्वास धुमाळ<br>शासनाचे सचिव,<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| श्री.अनिलकुमार लखिना<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको | सदस्य |
| श्री.अजित वर्टी<br>महानगर आयुक्त,<br>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण | सदस्य-सचिव |

<u>निमंत्रित</u> :

श्री.रामानंद तिवारी
शासनाचे सचिव,
नगर विकास विभाग

माननीय मुख्यंमत्री म्हणून नियुक्त झाल्यावर श्री.विलासराव देशमुख हे प्रथमच प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून बैठकीस उपस्थित राहिले होते. त्यावेळी सदस्यांनी त्यांचे सौहार्दपूर्वक स्वागत केले.

त्यानंतर, माननीय अध्यक्षांनी श्री.सुनिल तटकरे, नगर विकास राज्यमंत्री, श्री.विश्वास धुमाळ, शासनाचे गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाचे सचिव हे प्राधिकरणाचे पदाधिष्ठित सदस्य आणि श्री.प्रद्युमन मेहता, विधानसभा सदस्य हे प्राधिकरणाचे नामनिर्देशित सदस्य म्हणून मनःपूर्वक स्वागत केले. तसेच श्री.रोहिदास पाटील, गृहनिर्माण मंत्री हे पदाधिष्ठित सदस्य व श्री.सचिन अहिर, विधानसभा सदस्य हे नामनिर्देशित सदस्य हे सुध्दा प्राधिकरणाचे नवीन सदस्य झाले आहेत असेही मा.अध्यक्षांनी त्यानंतर सांगितले.

माजी मुख्यमंत्री श्री.नारायण राणे यांनी प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा माननीय अध्यक्षांनी गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर, माननीय अध्यक्षांनी श्री.सुरेशदादा जैन, माजी गृहनिर्माण मंत्री, श्री.कालिदास कोळंबकर, माजी नगर विकास राज्यमंत्री, श्री.वसंत डावखरे, विधानपरिषद सदस्य व श्री.गोविंद स्वरुप, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाचे माजी सचिव यांनी प्राधिकरणाचे सदस्य म्हणून बजावलेल्या सेवेचा माननीय अध्यक्षांनी गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर, प्राधिकरणाचे माजी उपाध्यक्ष प्रि.वामनराव महाडीक यांच्या दुःखद निधनाबद्दल माननीय अध्यक्षांनी शोक व्यक्त केला व त्यानंतर, प्राधिकरणाने, श्री.महाडीक यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव एक मिनिट स्तब्ध उभे राहून मंजूर केला. (जोडपत्र)

त्यानंतर, विषयपत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : दिनांक ३ ऑगस्ट, १९९९ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या (९६ व्या) बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे**

प्राधिकरणाने बाब क्र.१ मधील कार्यवृत्त बाब क्र. ७ व १२ वगळता पक्के केले आहे. (कृपया बाब क्र.३ पहावी)

**बाब क्र.२ : दिनांक ३ ऑगस्ट, १९९९ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या ९६ व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल**

कार्यवाही अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

**बाब क्र.३ : दिनांक ३ ऑगस्ट, १९९९ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या बैठकीत घेण्यात आलेल्या महत्वाच्या निर्णयांचे पुनर्विलोकन**

प्राधिकरणाने दिनांक ८ जून, १९९९ ते दिनांक १७ ऑक्टोबर, १९९९ या कालावधीत घेतलेल्या निर्णयांची माहिती शासनास सादर करण्यात आली होती. शासनाने कळविल्याप्रमाणे प्राधिकरणाने दि.३/८/१९९९ रोजीच्या बैठकीतील निर्णय नव्याने पुन्हा प्राधिकरणाच्या बैठकीत पुनर्विलोकनासाठी ठेवण्यात आले. बाब क्र.३.२ व ३.५ वगळता प्राधिकरणाने मागील बैठकीत घेतलेल्या निर्णयास मान्यता देण्यात आली.

**बाब ३.२ अग्निशमन केंद्र बांधण्यासाठी मुंबईच्या अग्निशमन दलाला प्रस्तावित "जी-टेक्स्ट" ब्लॉकमधील ५००० चौरस मीटरचा भूखंड देणे**

या संबंधी मागील बैठकीत मंजूर केलेला ठराव क्र.८१९ यातील कांही अटी जाचक होत **आहेत असे सदस्यांनी नमुद केले.** त्यातील अट क्र.२ अन्वये ज्यात अग्निशमन केंद्राची सेवा भूखंडाचा ताबा घेतल्यापासून २ वर्षाच्या आंत कार्यान्वित न केल्यास वाढीव अधिमूल्य आकारले जाईल ही अट बदलून एकूण ३ वर्षाची मुदत सेवा कार्यान्वित करण्यास द्यावी असे ठरले. त्या अनुषंगाने सुधारीत अट क्र.२ खालीलप्रमाणे असेल :

(२) "संबंधित भूखंडाचा ताबा घेतल्यापासून ३ वर्षाच्या कालावधीत अग्निशमन केंद्राच्या सेवा कार्यान्वित न झाल्यास रु.५०,०००/- प्रति चौरस मीटर या दराने भूखंडाच्या अधिमूल्याची रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिका प्राधिकरणास भरेल."

**बाब ३.५ धारावी प्रभागातील अनुक्रमांक सी.टी.एस्.५३१ हया १२४२७ चौरस मीटर मोकळया जमिनीचे त्यावर प्राधिकरणाने केलेल्या कुंपण वगैरे कामासह महाराष्ट्र शासनाला जिल्हा क्रिडा संकुल विकसित करण्यासाठी पुनः हस्तांतरण (परतीकरण)**

वांद्रे-कुर्ला संकुलातील धारावी मधील १२४२७ चौरस मीटर क्षेत्र असलेली जमीन व त्यावर करावयाच्या रु.३१.६२ लाखाच्या कामासह शासनाच्या महसूल व वन विभाग खात्याला, शासनाच्या क्रिडा आणि युवा कल्याण खात्याला जिल्हा क्रिडा संकुल विकसित करायला अटींच्या अधीन राहून मान्यता दिली होती. प्राधिकरणाकडे आर्थिक बळ असल्यामुळे प्राधिकरण क्रिडा संकुलाचा विकास चांगल्या प्रकारे करु शकेल असे मत माननीय अध्यक्षांनी मांडले. प्राधिकरणाने हया अगोदर मान्य केलेला ठराव क्र.८२१ रद्द करण्यात आला.

**बाब क्र.४ : विधानभवनाचे उत्तरेस प्राधिकरणाला दिलेल्या जमीनीपैकी काही जमीन छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यासाठी परत करणे.**

सदरहू बाब प्राधिकरणाच्या मान्यतेने मागे घेण्यात आली.

**बाब क्र.५ : मंजूर विकास योजना, अंबरनाथ स.नं.४१/१, ४३/५, ४२/३ व ४२/४ मौजे कहोज खुंटीवली, ही जमीन हरीत विभागातून रहिवास विभागात समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अन्वये फेरबदलाच्या कार्यवाही बाबत.**

संबंधित जागा ही महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांची असून त्या जागेचा उपयोग उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामधील अतिक्रमीतांचे पुनर्वसन करण्यासाठी शासनाने दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करावयाची आहे याचीही नोंद घेऊन खालील ठराव मंजूर करण्यात आला :-

**ठराव क्र. ८३१ :**

"अंबरनाथ शहराच्या मंजूर विकास योजनेत सर्व्हे क्र.४१/१, ४३/५, ४२/३ व ४२/४ मधील १.९८ हेक्टर हरित विभागात समाविष्ट असलेली जागा रहिवास विभागात समाविष्ट करण्यासाठी

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव संविधानातील कार्यवाही पूर्ण करुन शासनाच्या मंजूरीसाठी सादर करावा असे आदेश शासनाने प्राधिकरणास दिनांक ३ डिसेंबर, १९९९ च्या पत्रान्वये दिले आहेत. त्यास अनुसरुन असा ठराव करण्यात येतो की, शासनाने दिलेल्या आदेशान्वये अंबरनाथ येथील कहोज खुंटीवली मधील सदर १.९८ हेक्टर जमीन मंजूर विकास योजनेतील हरित विभागातून रहिवास विभागात समाविष्ट करण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पुरी करुन शासनाकडे सदर प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यात यावा. तसेच त्या अनुषंगाने अधिनियमानुसार आवश्यक असलेली सर्व कार्यवाही पुरी करण्यासाठी महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.६</u> : वडाळा ट्रक टर्मिनलमध्ये मुंबई मालवाहतूक संस्था (बी.जी.टी.ए.) व महासंघाला दिलेल्या भूखंडाच्या भाडेपट्टयाचा कालावधी २० वर्षावरुन ८० वर्षे वाढविणे व त्यांचे पोट सभासदांनी स्थापन केलेल्या सोसायटया/कंपन्यांबरोबर भाडेपट्टा विलेख करण्याबाबत**

यासंबंधी प्राधिकरणाच्या असे दृष्टोत्पतीस आणून देण्यात आले की, वडाळा भारवाहक तळासाठी लागणारी जागा शासनाने १९८२ पासून ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने दिली होती. त्यामुळे बीजीटीए व महासंघ यांना १९९३ साली प्राधिकरणाने त्या जमिनी १९ वर्षाच्या कालावधीसाठी दिल्या होत्या. त्यानंतर, शासनाने १९९७ मध्ये पूर्वीच्या निर्णयात बदल करुन भाडेपट्टयाचा कालावधी ९९ वर्षापर्यंत वाढविला. त्यामुळे आता प्राधिकरणास बीजीटीए व महासंघ यांचा भाडेपट्टयाचा कालावधीही ८० वर्षापर्यंत वाढविणे शक्य आहे. प्राधिकरण वांद्रे-कुर्ला संकुलामधील जमिनी आपल्या नेहमीच्या नियमाप्रमाणे ८० वर्षाच्या भाडेपट्टयाने देत असते.

प्राधिकरणाने बीजीटीए यांना १२ भूखंड व महासंघाला ८ भूखंड १९९३ मध्ये दिले आहेत. या संस्थांनी प्रत्येक भूखंडावर इमारत बांधून ती उभारण्यासाठी आपल्या सदस्यांच्या स्वतंत्र सोसायटया केल्या आहेत. त्यामुळे या संस्थांची अशी मागणी आहे की, भाडेपट्टयाचा विलेख हा थेट संबंधित सोसायटयांबरोबरच करावा. ही मागणीही वाजवी असल्याची नोंद घेण्यात आली. त्यानुसार प्राधिकरणाने पुढीलप्रमाणे ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.८३२ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम (२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण अशी मान्यता देत आहे की,

(१) प्राधिकरणाने ठराव क्रमांक ५४९, दिनांक २३/०३/१९९३ अन्वये मुंबई मालवाहतूक संघ (बी.जी.टी.ए.) व महाराष्ट्र राज्य टेम्पो व ट्रक वहातूक महासंघ (महासंघ) यांना भाडेपट्टयाने वडाळा ट्रक टर्मिनल येथील दिलेल्या भूखंडाचा कालावधी २० वर्षांवरुन ८० वर्षे वाढविण्यात यावा आणि

(२) बीजीटीए/महासंघ यांच्या सदस्य सोसायटया/कंपन्यांना प्रस्तावित बाब टिप्पणीमध्ये नमूद केल्याप्रमाणे भाडेपट्टा मंजूर करावा.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, महानगर आयुक्तांना सदर ठराव कार्यान्वयीत आणून व सुधारीत भाडेपट्टा करार बी.जी.टी.ए. व महासंघ यांचेबरोबर करण्याचे सर्व अधिकार प्रदान करण्यांत येत आहेत.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, महानगर आयुक्तांना बी.जी.टी.ए./महासंघ यांच्या सदस्य सोसायटया/कंपन्यांबरोबर भाडेपट्टा करार नमुना "ई" मध्ये कार्यसूची टिप्पणी मध्ये नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून करार करण्याचे सर्व अधिकार प्रदान करण्यात येत आहेत."

**<u>बाब क्र.७</u> : वडाळा भारवाहक तळातील ए-१, बी-१, बी-२ व डी-२ <u>या इमारतीतील रिकाम्या गाळयांचे वाटप करणेबाबत</u>**

महानगर आयुक्त यांनी मुंबईतील स्थावर मालमत्तेच्या किमतीत घट होत असल्याचे सांगितले. त्यामुळे वडाळा भारवाहक तळ येथील गाळे विक्रीसाठी जाहिरात देऊनही अपेक्षित असलेला प्रतिसाद प्राधिकरणास मिळालेला नाही. प्राधिकरणाने वडाळा भारवाहक तळ येथे एकूण २८३ गाळे बांधले. आतापर्यंत पाच वेळा जाहिरात देऊनही १०८ गाळेच वितरित केले गेले अजून १७५ गाळे वितरित करणे बाकी आहे. जानेवारी, १९९९ मध्ये प्राधिकरणाने मोठया प्रमाणात जाहिरात देऊनही फक्त ५ गाळयांचे वितरण करता आले. प्राधिकरणाने वडाळा भारवाहक तळासाठी मोठया प्रमाणात निधी गुंतविला असून गाळयांची अपेक्षित विक्री होत नसल्यामुळे प्राधिकरणाचा निधी त्यात अडकलेला आहे. सिडको व मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती या संस्थांनी त्यांच्या गाळयांना बाजारामध्ये उठाव नसल्यामुळे राखीव किमतीत घट केली आहे. हया पार्श्वभूमिवर गाळयांचे त्वरीत वितरण होण्याच्या दृष्टिने पूर्वीच्या कांही अटी शिथिल करण्याची आवश्यकता प्राधिकरणाने मान्य केली. त्यामध्ये केवळ मुंबई बेटातील परिवहन व्यापा-यांकडून अर्ज न मागविता ते महाराष्ट्रातील सर्व परिवहन व्यापा-यांकडून मागवावेत. राखीव दर रुपये २००४१ प्रति चौरस मीटरवरुन रुपये १२००० प्रति चौरस मीटर इतका खाली आणावा. दुस-या व तिस-या मजल्यावरील गाळे परिवहन वाहतूकदारांबरोबर त्यांच्याशी संबंधित वाणिज्यिक व व्यापारी संस्थांना उपलब्ध करुन द्यावेत. तसेच

वरीलप्रमाणे निविदा मागवूनही कांही गाळे शिल्लक राहिल्यास निविदांमध्ये आलेल्या सर्वात जास्त दराने प्रथम येईल त्यास प्रथम प्राधान्य या तत्वाने शिल्लक गाळयांचेही वाटप करावे या धोरणानुसार प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.८३३ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ३ चे पोटकलम (२) मधील अधिकारांचा वापर करुन आणि याबाबत लागू असलेल्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे ठराव क्र.७९८ मध्ये अंशतः बदल करुन वडाळा भारवाहक तळतील ए-१, बी-१, बी-२ व डी-२ या इमारतीमधील राहिलेले रिकामे गाळे वितरित करण्यासाठी बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र.४ व ५ मधील सुधारीत अटी व शर्तींच्या अधीन राहून मान्यता देत आहे.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी पुढील सर्व उपाययोजना करण्यासाठी याद्वारे महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

बाब क्र.८ : महाराष्ट्रातील महानगर क्षेत्रांसाठी नियोजन समितीची रचना करण्यासाठी लागू केलेल्या अध्यादेशाचे परिणाम

ही बाब टिप्पणी प्राधिकरणाच्या माहितीसाठी सादर करण्यात आली होती. प्राधिकरणाने या बाब टिप्पणीची नोंद घेतली.

**बाब क्र.९ : अंदाज समितीचा १९ वा अहवाल - पश्चिम उपनगरातील छोटया भाजीपाला व्यापा-यांसाठी छोटया बाजारपेठा निर्माण करणे**

अंदाज समितीच्या १९ व्या अहवालामध्ये मालाड ते बोरीवली येथील पश्चिम उपनगरामध्ये फळे व भाजीपाला यासाठी वेगळी छोटी बाजारपेठ निर्माण करण्याबाबतचा प्रश्न उपस्थित झाला होता. या प्रश्नांचा अभ्यास करुन त्या संबंधीचा प्रस्ताव शासनाने प्राधिकरणाकडून मागविला होता. त्यासाठी महानगर आयुक्तांनी एक अभ्यासगट नियुक्त केला होता. या अभ्यासगटाचे प्रमुख निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत :-

(१) मुंबईच्या पश्चिम रेल्वे लगतच्या उत्तरेकडील भागातून वाशी येथील मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती यांच्या यार्डामध्ये येणा-या फळे व भाज्यांचे प्रमाण १२ ते २५ टक्केच आहे;

(२) किरकोळ व्यापा-यांसाठी आणण्यात येणा-या मालावर वाशी मार्केट यार्डमध्ये जाण्याचे बंधन नाही;

(३) वाशी येथे ज्यावेळी मार्केट यार्ड स्थापन झाले त्यावेळी शासनाने दुसरे उपमार्केट मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती क्षेत्रात होणार नाही असे आश्वासन व्यापा-यांना दिले होते; आणि

(४) मालाड ते बोरीवली दरम्यान मार्केट यार्डसाठी जागा उपलब्ध नाही.

वरील निष्कर्षाच्या आधाराने अभ्यास गटाने मालाड ते बोरीवली येथे नवीन उपमार्केट करण्याऐवजी सिडकोने प्रस्तावित केल्याप्रमाणे वसई-विरार क्षेत्रामध्ये नवीन मार्केट यार्डची उभारणी करावी अशी शिफारस केली आहे.

या शिफारशीमुळे पश्चिम रेल्वे लगतच्या उत्तरेकडील भागातून माल प्रथम वाशी येथे नेणे व पुन्हा मालाड ते बोरीवली या भागात आणणे हयामुळे मालाची दोन वेळा वाहतूक करावी

लागणार आहे. तसेच या अभ्यास गटाने प्रत्यक्षपणे व्यापा-यांशी चर्चा करुन त्यांचा प्रश्न समजावून घेतल्याचे दिसत नाही, अशी नोंद करुन याच अभ्यास गटास पश्चिम उपनगरातील व तसेच या विषयाशी संबंधित फळे व भाजीपाला व्यापा-यांशी पुन्हा प्रत्यक्ष चर्चा करुन या संबंधीचा आपला अहवाल सादर करण्यास सांगावे असे प्राधिकरणाने ठरविले.

**बाब क्र.१०** : **प्राधिकरणाच्या व तिच्या कार्यकारी समितीच्या अशासकीय व तज्ञ सदस्यांना बैठक उपस्थितीसाठी बैठक शुल्क**

महानगर आयुक्त यांनी कार्यकारी समितीतील तज्ज्ञ सदस्यांना बैठक भत्ता दिला जात नाही तसेच प्राधिकरणाच्या अशासकीय सदस्यांना प्रतिदिन प्रति बैठकीस रु.१५०/- इतका बैठक भत्ता देण्यात येतो. हा भत्ता कमी आहे. कार्यकारी समितीच्या अशासकीय तज्ज्ञ सदस्यांना आणि प्राधिकरणातील अशासकीय सदस्यांना बैठकीस उपस्थित राहाण्याच्या भत्त्यामध्ये रु.१५०/- वरुन रु.५००/- पर्यंत वाढ करण्यात यावी असे सांगितले. सदरहू प्रस्तावावर चर्चा झाल्यानंतर प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर करुन सदर प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठवावा असे सांगितले.

ठराव क्र.८३४ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ५० सोबत उक्त अधिनियमाच्या कलम ४ चे उप-कलम (५) खालील प्रयोज्य शक्तींचा आणि त्या संदर्भात त्यास सक्षम बनविणा-या इतर सर्व शक्तींचा वापर करुन, हे प्राधिकरण बाब टिप्पणीच्या जोडपत्र-४ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

(सदस्यांस भत्ते) (दुरुस्ती) विनियम, १९९९ मध्ये आणि तिला राज्य शासनाची मान्यता मिळेल या गृहितकाच्या अधीन राहून याद्वारे मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, प्रस्तुत प्रकरणी राज्य शासनाला विनंती करण्याकरिता महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.११ : वांद्रे-कुर्ला संकुलातील "ई" ब्लॉकमधील फेरीवाला झोनमध्ये बांधलेल्या स्टॉल्सचे भाडेतत्वावर वाटप करणे**

१९९५ साली झालेल्या सर्वेक्षणानुसार ४१ स्टॉल्स धारकांचे पुनर्वसन करावे असे प्राधिकरणाने यापूर्वीच ठरविले आहे. त्याप्रमाणे १५ स्टॉल धारकांचे पुनर्वसन प्राधिकरणाच्या दि.३१/०८/९८ च्या ठराव क्र.८०४ प्रमाणे करण्यात आले. आता आणखी ६ स्टॉल्स पुनर्वसनासाठी उपलब्ध आहेत त्याचेही वाटप ठराव क्र.८०४ मधील अटी व शर्तींवर करावे. तसेच यापुढे उपलब्ध होणा-या स्टॉल्सचे वाटपही त्याच अटी व शर्तींवर करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करावे असे ठरले. त्यानुसार प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.८३५ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम (२) अनुसार मिळालेल्या अधिकारांचा आणि याबाबत यास सहाय्यभूत ठरणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे टप्पा-२ मधील सहा स्टॉल्सचे वाटप बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र.२ मधील प्रस्तावानुसार व परिशिष्ट-१ मधील अटी व शर्तींच्या अधीन राहून करण्यास मान्यता देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, वांद्रे-कुर्ला संकुलात फेरीवाला झोनमध्ये जसजसे स्टॉल्स बांधले जातील तसतसे त्यांचे राहिलेल्या २० स्टॉल्सधारकांना परिशिष्ट-१ मधील अटी व शर्तींच्या अधीन राहून वाटप करण्यास त्याचप्रमाणे परिशिष्ट-१ मधील अटी व शर्तीमध्ये फेरबदल करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, या ठरावाची अंमलबजावणी करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

<u>बाब क्र.१२</u> : **मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या कर्मचा-यांना सुधारीत दराने दिनांक १/८/१९९७ पासून घरभाडे भत्ता, स्थानिक पूरक भत्ता व वाहतूक भत्ता लागू <u>करुन त्याबाबतची थकबाकी प्रदान करण्याबाबत</u>**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कर्मचा-यांना विनियमातील नियम (३) प्रमाणे प्राधिकरणाच्या कर्मचा-यांचे वेतन व भत्ते व इतर सेवा शर्तींच्या नियमांचे (भविष्य निर्वाह निधी, गट उपदान व निवृत्ती वेतन योजना) जोपर्यंत प्राधिकरण यासंबंधी स्वतंत्र विनियम तयार करीत नाही तोपर्यंत योग्य त्या फेरफारासह महाराष्ट्र शासनाच्या कर्मचा-यांना वेळोवेळी लागू करण्यात आलेले नियम/आदेशाप्रमाणे लागू रहातील. शासकीय कर्मचा-यांना सुधारीत दराने दि.१/८/१९९७ पासून घरभाडे भत्ता, स्थानिक पूरक भत्ता व वाहतूक भत्ता लागू करण्यात आला असून दि.१/८/१९९७ ते ३०/९/१९९८ या कालावधीतील थकबाकी शासन निर्णयानुसार भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा करण्यात यावी व त्यावर मार्च, २००२ पर्यंत व्याज अनुज्ञेय राहाणार नाही असे आदेश दिलेले आहेत. प्राधिकरणातील कर्मचा-यांना घरभाडे भत्ता, स्थानिक पूरक भत्ता व वहातूक भत्ता देय आहे व सदरहू थकबाकीची रक्कम रोखीने देण्याचा प्रस्ताव करण्यात आलेला आहे. याचे मुख्य कारण

म्हणजे प्राधिकरणाने भविष्य निर्वाह निधीचे स्वतंत्र नियम तयार केलेले आहेत व नियमानुसार सदरहू थकबाकीच्या रकमेवर १२% व्याज द्यावे लागणार आहे. तसेच भविष्य निर्वाह निधीच्या गुंतवणूकीवर प्राधिकरणास १२ टक्क्यापेक्षा कमी दराने व्याज मिळते. जरी भविष्य निर्वाह निधीवरील व्याजाचा दर कमी करण्याचा अधिकार व्यवस्थापनास असला तरी केंद्र शासनाने/शासनाने कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या व्याजाच्या दरात कपात केलेली नाही. त्यामुळे कर्मचा-यांना सदरहू थकबाकीची रक्कम रोखीने देण्यात यावी असे प्रस्तावित करण्यात आले आहे. सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग व व्यवस्थापकीय संचालक सिडको यांनी प्राधिकरणातील कर्मचा-यांना थकबाकीची रक्कम रोखीने दिल्यास सिडको व इतर सार्वजनिक उपक्रमातील कर्मचारीही तशीच मागणी करतील असे मत प्रदर्शित केले. सदरहू प्रस्तावावर चर्चा होऊन खालील ठराव मंजूर करण्यात आला :-

<u>ठराव क्र. ८३६</u> :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम ७४ चे कलम ११ चे उपकलम (२) तसेच मुं.म.प्र.वि.प्रा.सेवेच्या शर्ती विनियम १९७७ व सहाय्यभूत होणा-या इतर अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण शासन निर्णय वित्त विभाग क्र.घभाभ-१०९९/प्र.क्र.८१/९९ सेवा-५ दिनांक ७/९/१९९९ व शासन निर्णय क्र. वाहभ-१०९९/प्र.क्र.८२/९९/ सेवा - ५ दिनांक ७/९/१९९९ नुसार प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचा-यांस सुधारीत दराने दिनांक १/८/१९९७ पासून घरभाडे भत्ता, स्थानिक पूरक भत्ता व वहातूक भत्ता लागू करण्यास याद्वारे मंजूरी देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, दिनांक १/८/१९९७ ते ३०/९/१९९८ या कालावधीतील थकबाकीपोटी देय होणारी रक्कम कर्मचा-यांना रोखीत अदा करण्याबाबत शासनाची मंजूरी घेण्यात यावी. मंजूरी घेतल्यानंतरच पुढील कार्यवाही करण्यात यावी.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचा-यांना वेतनश्रेण्या व अनुषंगिक भत्ते राज्य शासकीय कर्मचा-यांप्रमाणेच शासन निर्णयानुसार जसेच्या तसे लागू करण्यात येत असल्यामुळे यापुढे शासन निर्णयानुसार वेळोवेळी जाहीर केलेले अनुषंगिक भत्ते व वेतनश्रेण्या जसेच्या तसे लागू करण्यास याद्वारे महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१३ : मुं.म.प्र.वि.प्राधिकरणातील उपनियोजक व उप परिवहन नियोजक या संवर्गातील अधिका-यांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन नियम १९९८) नियमाप्रमाणे सुधारीत वेतनश्रेणी लागू करण्याबाबत**

सदरहू प्रस्तावित उपनियोजक व उप परिवहन नियोजक या संवर्गातील कर्मचा-यांना शासनाप्रमाणे सुधारीत वेतनश्रेणी सुचविली असल्यामुळे बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.८३७ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ११ चे उपकलम (२) तसेच मुं.म.प्र.वि.प्राधिकरण (सेवेच्या शर्ती) विनियम, १९७७ व याबाबत सहाय्यभूत होणा-या इतर अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे शासनाने दिनांक २८/९/१९९९ क्र.संकीर्ण-१०९९/२०४/प्र.क्र.२३/भाग-२/९९/नवि-१० अन्वये दिलेल्या मंजूरीनुसार प्राधिकरणातील उपनियोजक व उप परिवहन नियोजक या रु.२२००-३७०० या विद्यमान वेतनश्रेणीतील पदास पाचव्या वेतन आयोगातील शिफारशीनुसार रु.८०००-१३५०० अशी सुधारीत वेतनश्रेणी दिनांक १/१/१९९६ पासून पूर्वलक्षीत प्रभावाने लागू करण्यास याद्वारे मंजूरी देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, सुधारीत वेतनश्रेणी व इतर अनुषंगीक भत्ते लागू करण्यासंबंधी प्राधिकरणाने ठराव क्र.८२४, दिनांक ३/८/१९९९ रोजी मंजूर केलेल्या ठरावातील इतर अटी जशाच्या तशा लागू रहातील."

**बाब क्र.१४ : मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाचे विधी सल्लागार यांच्या मानधनात व वाहन भत्त्यात सुधारणा**

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.८३८ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ११ चे पोटकलम (२) यामध्ये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करुन तसेच त्यांच्या दि.३१ मे, १९९४ च्या ठराव क्र.६०५ व दिनांक ७ जून, १९९७ च्या ठराव क्र.७२८ मध्ये अंशत: फेरफार करुन प्राधिकरण याद्वारे प्राधिकरणाचे मानसेवी विधी सल्लागार यांचे मानधन दरमहा रु.६००० वरुन रु.८००० असे सुधारण्यास व मानसेवी विधी सल्लागार यांना वाहन खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी देण्यात येणा-या प्रतिपूर्तीची मर्यादा दरमहा रु.१५०० वरुन रु.२००० पर्यंत वाढविण्यास तसेच या दोन्ही वाढी दिनांक १ फेब्रुवारी, २००० पासून अंमलात आणण्यास मंजूरी देत आहे."

**बाब क्र.१५ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सन १९९७-९८ चा वार्षिक अहवाल**

प्राधिकरणाचा १९९७-९८ च्या प्रारुप वार्षिक अहवाल सादर करण्यास उशीर झाल्याबाबत माननीय मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी नापसंती व्यक्त केली असता, महानगर आयुक्त यांनी सदरहू वार्षिक अहवाल सादर करण्यासाठी झालेल्या विलंबाची कारणे शोधण्यात येतील व जबाबदारी निश्चित करण्यात येऊन विधीमंडळासमोर ठेवावयाच्या वार्षिक अहवालासोवत विलंवाची कारणे शासनाकडे पाठविण्यात येतील. त्यानंतर, प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. ८३९ :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १९९७-९८ सालच्या वार्षिक अहवालाला हे प्राधिकरण मान्यता देत आहे व हा अहवाल राज्य शासनास सादर करण्यासाठी महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्र.१६ : प्राधिकरणाचे सन १९९८-९९ चे वार्षिक लेखे**

१९९८-९९ सालच्या प्राधिकरणाच्या लेख्यांना मान्यता देऊन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. ८४० :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, विषय टिप्पणी सोबत सादर केलेल्या प्राधिकरणाच्या १९९८-९९ च्या वार्षिक लेख्यांची प्राधिकरण याद्वारे नोंद घेत आहे व त्यास मान्यता देत आहे."

**बाब क्र.१७ : मुंमप्र - वास्तुवारसा संरक्षण संस्था व मुंमप्र - पर्यावरण सुधारणा संस्था यांचे दि.१४/११/९६ ते ३१/०३/९७ व दि.०१/०४/९७ ते ३१/०३/९८ या कालावधीचे परीक्षीत लेखे व वार्षिक अहवाल**

दि.१४/११/९६ ते ३१/०३/९७ व दि.०१/०४/९७ ते ३१/०३/९८ या कालावधीचे परीक्षीत लेखे व वार्षिक अहवाल यास मान्यता देऊन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ८४१ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, विषय टिप्पणी सोबत सादर केलेल्या मुंमप्र - वास्तुवारसा संरक्षण संस्था व मुंमप्र - पर्यावरण सुधारणा संस्था यांचे दि.१४/११/९६ ते ३१/०३/९७ व दि.०१/०४/९७ ते ३१/०३/९८ या कालावधीचे परीक्षीत लेखे व वार्षिक अहवाल यांची प्राधिकरण याद्वारे नोंद घेत आहे व त्यास मान्यता देत आहे."

**बाब क्र.१८ : राष्ट्रीय कृषि आणि ग्रामीण विकास बँकेस वांद्रे-कुर्ला संकुलातील निवासी भूखंड क्र.४-अ क्षेत्र ३००० F.S.I. चौरस मीटर वाटप करण्याबाबत**

प्राधिकरणाच्या ९५ व्या बैठकीतील निर्णयाप्रमाणे वांद्रे-कुर्ला संकुलातील आस्थापनांकडून त्यांच्या कर्मचारीवर्गाच्या निवासस्थानांसाठी वांद्रे-कुर्ला संकुलातील चार भूखंडासाठी दिनांक १८/१२/१९९९ रोजी जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा दाखल करण्याची शेवटची तारीख दिनांक १२/१/२००० अशी निश्चित करण्यात आली होती. चार भूखंडांपैकी फक्त

भूखंड क्र.R4-A साठी राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक, मुंबई यांची निविदा प्राप्त झालेली आहे. त्यांनी सदरहू भूखंडासाठी भाडेपट्ट्याची रक्कम बांधकाम क्षेत्राच्या प्रति चौरस मीटरला रु.२५००१/- भरली आहे. स्थावर मालमत्तेचा बाजारभाव लक्षात घेता बँकेने भरलेल्या निविदेची रक्कम योग्य आहे असे ठरवून प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.८४२ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम (२) अन्वये मिळालेल्या तसेच याबाबत सहाय्यभूत होणा-या अन्य शक्तींचा वापर करुन प्राधिकरण वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी" ब्लॉकमधील निवासी भूखंड क्र. R4-A ज्यावरील अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र ३,००० चौरस मीटर आहे, निविदेतील शर्ती व अटीस अधीन राहून रु.७,५०,०३,०००/- या अधिमूल्याने ८० वर्षाच्या भाडेपट्ट्याने राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेस देण्यास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यास तसेच वाटपग्रही बरोबर करावयाचा भाडेपट्ट्याच्या विलेखामध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यासाठी महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**बाब क्र.१९ : वडाळा भारवाहक तळातील टप्पा-१ येथील वजनकाटा व धाबा/डॉर्मिटरी साठी असलेल्या भूखंडांचे वितरण**

वडाळा भारवाहक तळ टप्पा-१ मध्ये वजनकाटा व धाबा/डॉर्मिटरीसाठी राखून ठेवलेल्या भूखंडाची वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. वजनकाटयासाठी दहा

निविदा आलेल्या आहेत व धाबा व डॉर्मिटरीसाठी दोन निविदा आलेल्या आहेत. वजनकाटा भूखंडासाठी निविदेमध्ये रु.३६,१४,६७५/- इतक्या सर्वोच्च रकमेची निविदा प्राप्त झालेली आहे. तसेच धाबा व डॉर्मिटरीसाठी रु.६१,००,०००/- इतक्या सर्वोच्च रकमेची निविदा प्राप्त झालेली आहे व दोन्ही निविदा पात्र आहेत. मुंबईतील स्थावर मालमत्तेच्या घसरत्या किमती विचारात घेता प्राप्त झालेल्या निविदांतील रक्कम ही अपेक्षित नसली तरी प्राधिकरण हे विकासाचे काम करीत असल्यामुळे वजनकाटा व धाबा/डॉर्मिटरी हया भारवाहक तळास आवश्यक अशा सेवा असल्याने प्राप्त झालेल्या सर्वोच्च निविदा मान्य करण्यात याव्यात असे ठरवून प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.८४३</u> :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम (२) मधील शक्तींचा वापर करुन आणि याबाबत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व शक्तींचा वापर करुन प्राधिकरण वडाळा भारवाहक तळाच्या टप्पा-१ मधील धाबा व डॉर्मिटरी या भूखंडासाठी श्री.राकेश सबनाशीराम धोंडी यांनी सादर केलेली रु.६१/- लाखाची सर्वोच्च निविदा, त्याचप्रमाणे वजनकाटा भूखंडासाठी मे.अरुणोदय महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था यांनी सादर केलेली रु.३६,१४,६७५/- रकमेची सर्वोच्च निविदा स्विकारुन सदर भूखंड ८० वर्षाच्या भाडेपट्टयाने निविदाकारास वाटप करण्यास मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.२० : ४५ - मीटर रुंद जोड रस्ता वांद्रा-कुर्ला येथील जमीन वांद्रा-कुर्ला जोडरस्त्यासाठी वाटाघाटीने घेण्याबाबत**

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.८४४ :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम (२) अन्वये मिळालेल्या तसेच याबाबत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व शक्तींचा वापर करुन प्राधिकरण श्री.पत्रावाला यांना ठराव क्र.७७० च्या अन्य अटी व शर्तींच्या अधीन राहून वांद्रे-कुर्ला संकुलातील ८१९.३० चौरस मीटर क्षेत्रफळाचा भूखंड अग्निशमन केंद्राच्या दक्षिणेस व २४.०० मीटर रुंद रस्त्याच्या लगत देण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्र.२१ : वांद्रे-कुर्ला संकुलातील संमेलन केंद्र व पंचतारांकित हॉटेल**

मुंबईमध्ये संमेलन व प्रदर्शन केंद्र यांची अतिशय गरज आहे असे प्रतिपादन करुन प्राधिकरणाने पूर्वी दोन वेळा असे केंद्र विकसित करण्याच्या दृष्टीने केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेण्यात आला. त्यावरुन असे निष्कर्ष मांडण्यात आले की, आता पूर्वी इतके अधिमूल्य जमिनीसाठी मिळण्याची शक्यता नाही. तसेच पूर्वीच्या संमेलन व प्रदर्शन केंद्राची व्याप्ती फार मोठी व महत्वाकांक्षी होती. त्यामध्ये बदल करुन केंद्राचे बांधकाम क्षेत्र सुमारे २० हजार चौरस मीटरने कमी करणे योग्य ठरेल असे सुचविण्यात आले. परंतु केंद्राच्या भविष्यकालीन विस्तारासाठी एक हेक्टर जमीन राखून ठेवण्यात यावी असेही प्रस्तावित करण्यात आले.

संमेलन व प्रदर्शन केंद्र तसेच त्या बरोबरीने असणारे तारांकित हॉटेल यांच्या विकासात प्राधिकरणाने सक्रीय भाग घ्यावा व त्यासाठी एक एस.पी.व्ही.तयार करावी असे प्रतिपादन काही सदस्यांनी केले आहे. परंतु अशात-हेच्या पब्लिक प्रायव्हेट पार्टनेंशिप्स फारशा यशस्वी होत नाही असा अनुभव असल्याने जमिनीची किंमत कमी येईल हे गृहीत धरुनच संमेलन व प्रदर्शन केंद्र आणि तारांकित हॉटेल याकरिता असलेला भूखंड वितरित करावा असे ठरले. त्यानुसार प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.८४५</u> :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ४, पोटकलम (२) अन्वये तसेच कलम ५० अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा व अन्य शक्तींचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे संमेलन व प्रदर्शन केंद्र व तारांकित हॉटेलसाठी राखून ठेवलेल्या भूखंडाच्या बाबतीत :-

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीचे वितरण) विनियम, १९७७ (सुधारीत १९९७) यातील नियम १६ अन्वये खालील नियमात बदल करीत आहे :-

(अ) फॉर्म "डी" च्या कलम २(अ) मधील नकाशे सादर करण्याची मुदत ६ महिने करणे;

(ब) फॉर्म "डी" च्या कलम २(ड) मधील बांधकाम पूर्ण करण्याची मुदत ५ वर्षे अशी करण्यात येत आहे; आणि

(क) नियम ९ मधील अधिमूल्य भरण्याची मुदत व पध्दतीत टिप्पणीत सुचविल्याप्रमाणे बदल करणे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ४६ क अन्वये प्रदान केलेल्या व अन्य शक्तींचा वापर करुन प्राधिकरण महानगर

आयुक्तांना संमेलन व प्रदर्शन केंद्राच्या भूखंडासाठी वरील सुधारीत नियमांच्या आधारे व परिशिष्ट-१ मधील टिप्पणीनुसार योग्य ते निविदापत्र तयार करुन योग्य त्या प्रसार माध्यमाद्वारे निविदा मागविण्यास व त्यासाठी आवश्यक असल्यास तज्ज्ञांचे सहाय्य घेण्यास प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्र.२२ : वांद्रे-कुर्ला संकुलातील शाळेसाठी आरक्षित भूखंड व खेळाच्या मैदानासाठी राखीव भूखंड क्र.२१-अ भाडेपट्टयाने देण्याबाबत**

महानगर आयुक्त यांनी वांद्रे-कुर्ला संकुलातील शाळेसाठी आरक्षित असलेल्या भूखंडासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यासाठी एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या असून मे.जे.एच.अंबानी फाऊंडेशन यांची रु.३४००/- प्रति चौरस मीटर बांधकाम क्षेत्रासाठी असलेली सर्वोच्च निविदा प्राप्त झालेली आहे. प्राधिकरणाच्या सदस्यांनी शासन सुध्दा शाळेसाठी सवलतीच्या दरात भूखंड देत असते तसेच शाळेसाठी आरक्षित भूखंड भाडेपट्टयाने देण्यासाठी आलेला दर हा कमी वाटत असला तरी तो निविदा मागवून आल्यामुळे मे.जे.एच.अंबानी फाऊंडेशन यांना भूखंड देण्यात यावा असे मत प्रदर्शित केले. त्यानंतर,प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ८४६ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम (२) आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ चा नियम ४(दोन) याद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक शाळा सुरु करण्यासाठी वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "ई" ब्लॉकमधील सुमारे

३५२८.८८ चौरस मीटर शाळेचा भूखंड व आरजी-२१-अ हा २१९४.५६ चौरस मीटर क्षेत्रफळाचा क्रिडांगणाचा भूखंड विनियमाच्या "डी" नमुन्यातील भाडेपट्टा कराराच्या तारखेपासून ८० वर्षाच्या भाडेपट्टयाने मे.जे.एच.अंबानी फाऊंडेशन, मुंबई या संस्थेस निविदेतील अटी व शर्तींच्या अधीन राहून प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, महानगर आयुक्त यांना या ठरावाची अंमलबजावणी करण्यास आणि आवश्यक असेल त्याप्रमाणे "डी" नमुन्यातील भाडेपट्टा कराराच्या नमुन्यात आणि "ई" नमुन्यातील भाडेपट्टा विलेखाच्या नमुन्यात योग्य ते बदल करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.२३ : केंद्र पुरस्कृत महानगर योजनेसाठी प्राधिकरणातर्फे अंमलबजावणी संस्थांना संस्थात्मक कर्जाच्या स्वरुपात वित्तीय सहाय्य देणे**

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ८४७ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम २१-अ अंतर्गत प्राप्त झालेल्या शक्तींचा तसेच या बाबतीत सहाय्यभूत होणा-या इतर शक्तींचा वापर करुन रुपये २६७.९७ कोटीच्या नव्या प्रकल्पांसाठी संस्थात्मक वित्त सहाय्याच्या स्वरुपात रुपये ७६.५६ कोटींची रक्कम वार्षिक १४% व्याजदराने व १० वर्षाच्या परतफेडीच्या कालावधीने (परतफेडीतील सुटीचा कालावधी सोडून) लागेल त्या प्रमाणात महानगर योजना - फिरता

निधीमध्ये बाब टिप्पणीच्या परिच्छेद २ ते ५ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे जमा करण्यास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे."

**<u>बाब क्र.२४</u> : प्राधिकरणाचे सन २०००-२००१ चे <u>वार्षिक कार्ये-कार्यक्रम</u>**

सन २०००-२००१ चा वार्षिक कार्ये-कार्यक्रम मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.८४८</u> :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमाचे कलम २३(१) अन्वये दिलेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण –

(अ) टिप्पणीसह सादर केलेला २०००-२००१ सालचा वार्षिक कार्ये-कार्यक्रम, २०००-२००१ सालचा मुंबई नागरी प्रकल्प - फिरता निधीचा वार्षिक कार्ये-कार्यक्रम आणि महानगर योजना - फिरता निधीचा (मेगासिटी योजना) वार्षिक कार्ये-कार्यक्रम यांना याद्वारे मंजूरी देत आहे; व

(ब) वार्षिक कार्ये-कार्यक्रमात अंतर्भूत केलेल्या योजनांच्या तपशिलाला मान्यता देण्यास कार्यकारी समितीला याद्वारे प्राधिकृत करीत आहे."

**<u>बाब क्र.२५</u> : <u>प्राधिकरणाचा सन २०००-२००१ चा वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाज</u>**

सन २०००-२००१ चे अर्थसंकल्पीय अंदाज मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ८४९</u> :

"असा ठराव करण्यात येत आहे की, महानगर प्राधिकरणाच्या अंदाजित जमा व खर्च दर्शविणारा २०००-२००१ सालाचा अर्थसंकल्प आणि १९९९-२००० सालचे सुधारीत अंदाज मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम,१९७४ चे कलम २३ (१) खाली मंजूर करण्यात येत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, २०००-२००१ च्या अर्थसंकल्पीय अंदाज पत्रकात महाराष्ट्र निर्सग उद्यान संस्थेला रु.१८० लाख इतका भांडवली/विकास खर्चासाठी तसेच व्यवस्थापन व देखभाली पोटी करावयाच्या खर्चास आणि १९९९-२००० हया वर्षात वरील संस्थेस अनुदान म्हणुन अदा करण्यात येणा-या रु.५० लाखाच्या खर्चास मान्यता देण्यास हे प्राधिकरण महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरण या द्वारे कार्यकारी समितीला योजना सर्वेक्षण इत्यादी कार्यक्रम अहवालात समाविष्ट न केलेल्या आणि प्रत्येकी रु.१० लाखापेक्षा अधिक व्यय नसलेल्या बाबींना मंजूरी देण्याचा आणि या मर्यादेपेक्षा अधिक व्यय नसलेला व मंजूर अर्थसंकल्पात तरतूद न केलेला कोणताही खर्च करण्याचा अधिकार, अशा प्रकरणाचा अहवाल आगामी बैठकीत प्राधिकरणाला सादर करण्याच्या अटींवर देत आहे.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरण याद्वारे मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधी आणि महानगर योजना फिरता निधी यांचे अंदाजित जमा व खर्च दर्शविणारे २०००-२००१ चे अर्थसंकल्पीय अंदाज व १९९९-२००० चे सुधारीत अंदाजास मंजूरी देत आहे."

<u>बाब क्र.२६</u> : <u>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण कर्मचारी (गृहनिर्माण कर्जे) विनियम, १९८१ मध्ये दुरुस्ती</u>

प्राधिकरणाच्या सेवेतील कर्मचा-यांना घर बांधण्यासाठी/ घर खरेदी करण्यासाठी वैयक्तिक कर्ज शासनाच्या कर्जाच्या कमाल मर्यादेनुसार मंजूर करण्यात येतात. शासकीय कर्मचा-यांना पाचवा वेतन आयोग लागू केल्यामुळे घर बांधणीच्या अग्रीम रकमेच्या कमाल मर्यादेत वाढ करण्यात आली असून त्यावर व्याजाचा दरही निश्चित केलेला आहे. प्राधिकरणातील कर्मचा-यांना शासना प्रमाणे पाचवा वेतन आयोग लागू करण्यात आल्यामुळे शासन निर्णयानुसार शासनाच्या धर्तीवर घर खरेदीसाठी व घर बांधणीसाठी अग्रीमाच्या कमाल मर्यादेत वाढ करण्यात यावी असे प्रस्तावित केले आहे. सदरहू बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन खालील ठराव मंजूर करण्यात आला :-

<u>ठराव क्र. ८५०</u> :

"असा ठराव करण्यात येत आहे की, हे प्राधिकरण मुं.म.प्र.वि.प्राधिकरणातील नियम १९७४ च्या कलम ११(१) उपकलम (२) सोबत अधिनियमाचे कलम ५० खाली प्राप्त झालेल्या प्रयोज्य शक्तींचा वापर करुन बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे सोबत जोडलेल्या जोडपत्राप्रमाणे निवेदन केल्याप्रमाणे मुं.म.प्र.वि.प्राधिकरण कर्मचारी व्यक्तीगत गृहनिर्माण कर्जे विनियम, १९८१ मध्ये दुरुस्तीस मान्यता देत आहे."

**बाब क्र.२७ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणात मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (एमयुटीपी) साठी प्रकल्प व्यवस्थापन/संनियंत्रण पथक स्थापन करणे**

महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, जागतिक बँकेने नागरी परिवहन प्रकल्प राबविण्यासाठी प्राधिकरणात "प्रकल्प व्यवस्थापन/सनियंत्रण पथक" लवकर स्थापन करण्यावर आग्रह धरल्यामुळे सदर पथक स्थापण्यास शासनाने आधीच मान्यता दिलेली आहे. त्यानुसार प्राधिकरणात पथक स्थापण्यात आले असून त्यावर प्रकल्प संचालकाची शासनाने नेमणूक केलेली आहे. त्यामुळे प्राधिकरणाची कार्योत्तर मंजूरी मिळण्याची जरुरी आहे. या पथकासाठी आवश्यक असलेला अधिकारी व कर्मचारीवर्ग हा शक्यतो प्रतिनियुक्तीवर/कंत्राट पध्दतीने तसेच प्राधिकरणातील अधिका-यांच्या पुनर्पाखरणाने विविक्षित कालावधीसाठी भरण्यात येईल. परंतु उपरोक्त पध्दतीने भरलेल्या पदासाठी प्रस्तावित बाब टिप्पणीमध्ये नमुद केलेली वेतनश्रेणी (परिच्छेद ३.१ मधील) मात्र तंतोतंत लागू राहणार नाही. आस्थापनावरील खर्चाची प्रतिपूर्ति जरी जागतिक बँकेकडून कर्जाच्या स्वरुपात होणार असली तरी आस्थापनावर कमीत कमी खर्च होईल व शासनाने वेळोवेळी काढलेल्या आदेशाचे पालन केले जाईल.

या चर्चेच्या वेळी मुख्य साचिवांनी असे सांगितले की, श्री.सुनिल सोनी यांना प्रस्तावित मुंबई रेल्वे विकास महामंडळावर महाराष्ट्र शासनातर्फे संचालक म्हणून नेमण्यात येणार आहे. परंतु सदर महामंडळ प्रत्यक्ष कार्यान्वित होण्यास काही कालावधी लागण्याची शक्यता असल्यामुळे या कालावधीमध्ये श्री.सोनी यांना प्राधिकरणावर "विशेष कार्य अधिकारी" म्हणून पाठविण्यात यावे म्हणजे त्यांना त्यांच्या कामाची योग्य ती माहिती करुन घेता येईल. या कालावधीमध्ये श्री.सोनी यांना शासकीय आदेशानुसार देय असलेले सर्व वेतन व इतर भत्ते प्राधिकरणाच्या निधीतून द्यावेत.

माननीय मुख्यमंत्र्यांनी सदर प्रस्तावास अनुकूलता दर्शविली व प्राधिकरणाने त्यास मान्यता दिली. त्यानुसार, प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ८५१ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ११(२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणात मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (एमयुटीपी) साठी, बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे (परिच्छेद क्र.३.१ ते ३.५), प्रकल्प व्यवस्थापन/संनियंत्रण पथक व त्यामधील पदे विविक्षित कालावधीसाठी निर्माण करण्याच्या प्रस्तावास प्रस्ताविल्याप्रमाणे मान्यता देत आहे. अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करताना ते एकतर प्रतिनियुक्तीवर/कंत्राटी पध्दतीने/प्राधिकरणातील अधिका-यांच्या पुनर्पाखरणाने नियुक्त करण्यात येतील. प्राधिकरणातील अधिका-यांची पुनर्पाखरणाने नियुक्ती करताना सदर पदे बढती/पदोन्नतीसाठी म्हणून विचारात घेतली जाणार नाहीत. त्याचप्रमाणे प्रकल्प सहसंचालक व प्रकल्प व्यवस्थापक या पदांपैकी काही पदे आवश्यकतेनुसार एकत्र करण्यात येतील.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, महानगर आयुक्त यांना पदाच्या पदनामात आवश्यकतेनुसार बदल, गरजेप्रमाणे पदांच्या वेतनश्रेणीत एक किंवा जास्त स्तर कमी करणे, काही पदे आवश्यकतेनुसार एकत्र करणे, योग्य ती वेतनश्रेणी/ एकत्रित पगार देणे इ.व त्याची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, श्री.सुनिल सोनी यांना, पुढील निर्णय होईपर्यंत, प्राधिकरणामध्ये "विशेष कार्य अधिकारी" म्हणून नेमणूक करण्यात यावे व त्यांना

शासकीय आदेश/नियम यानुसार देय असलेले वेतन व इतर भत्ते प्राधिकरणाच्या निधीतून देण्यात यावेत.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्प ह्यावर होणारा सर्व खर्च प्रथम प्राधिकरणाच्या निधीतून करण्यात यावा व मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाच्या खाती नावे करण्यात यावा."

**बाब क्र.२८ : मुंबई महानगर प्रदेशातील क्षेत्रामध्ये ग्रामसुधार योजनेखाली १९९९-२००० या वर्षामध्ये अनुक्रमे ठाणे व रायगड जिल्हा परिषद यांना अनुदान देण्याबाबत**

या विषयावरील चर्चेच्या वेळी मा.राज्यमंत्री, नगर विकास यांनी ठाणे व रायगड जिल्हा परिषदांकडून आणखी प्रकल्प प्रस्ताव सादर झाल्यास पुढील वर्षापासून योजने अंतर्गत देण्यात येणा-या अनुदानाच्या रकमेमध्ये वाढ करावी अशी सूचना केली. त्यानंतर, प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ८५२ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, ठाणे जिल्हा परिषद व रायगड जिल्हा परिषद यांना बाब टिप्पणीच्या परिच्छेद-३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे ग्रामसुधार योजने अंतर्गत ठाणे जिल्हा परिषदेस रु.१६,५६,१९४ व रायगड जिल्हा परिषदेस रु.२६,७७,७०० इतक्या खर्चाच्या ग्रामसुधार प्रकल्पांना प्राधिकरण, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम २१-अ मधील तरतुदीनुसार मंजुरी देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, १९९९-२००० या वर्षाच्या अंदाजपत्रकातील संमत तरतुदींच्या अधीन राहून प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रस्तावित योजनांच्या खर्चाकरिता अनुदानीत रकमेचे वितरण व प्रकल्पांच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करण्यास प्राधिकरण याद्वारे महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्र.२९ : मुंबई महानगर प्रदेशातील बाहय रस्त्यांची सुधारणा - उप-प्रकल्प पाच-अ व पाच-ब — अनुदानाची रक्कम वाढविणे**

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. ८५३ :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम २१ अ अनुसार मिळालेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे बाब टिप्पणीमध्ये समाविष्ट असल्याप्रमाणे मुंबई महानगर प्रदेशातील (महापालिका क्षेत्राबाहेरील) रस्त्यांच्या मुलभूत सोयीमध्ये सुधारणा करण्याविषयीचे उपप्रकल्प पाच-अ व पाच-ब हाती घेण्यास आणि प्रस्तावित केल्याप्रमाणे अंमलबजावणीसाठी जबाबदार असलेल्या स्थानिक संस्थांना नवीनतम अंदाजित खर्चाच्या अनुदानाची रक्कम ७५% वरुन ९०% रक्कम वाढविण्यास प्राधिकरण आपली मान्यता देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, वरील अटी व शर्तींच्या अधीन राहून, याबाबतीत आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास आणि सर्वसाधारण मान्यता देण्यास तसेच वेळोवेळी अनुदान वितरित करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.३०** : **मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समितीस दिलेल्या कर्जावरील दंडनीय व्याज व कर्जत कृषि उत्पन्न बाजार समितीस दिलेल्या कर्जावरील व्याज माफ करणेबाबत**

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ८५४ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ अनुसार मिळालेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समितीला कळंबोली येथील बाजार आवारातील विकास कामे करण्याकरिता दिलेल्या रु.२५/- लाख कर्जावरील थकीत दंडनीय व्याज रु.७७,४२३/- माफ करण्याच्या प्रस्तावाला मान्यता देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, कर्जत कृषि उत्पन्न बाजार समितीस कर्जत येथील बाजार आवारातील विकासाची कामे करण्यास दिलेल्या रु.५.८० लाख या कर्जावरील व्याजाची रक्कम रु.२,९५,१२९/- माफ करण्याच्या प्रस्तावालाही मान्यता देत आहे."

**बाब क्र.३१** : **वांद्रे-कुर्ला संकुलात इंडियन न्यूज पेपर सोसायटीला (आय.एन.एस.) भूखंड देणे**

इंडियन न्यूज पेपर सोसायटी कंपनी कायद्याच्या कलम २५ खाली नोंदलेली म्हणजे लाभांश न वाटणारी संस्था आहे व तिच्या वांद्रे-कुर्ला संकुलातील उपस्थितीमुळे संकुलाचा व एकंदरीत सर्वच वृत्त

व्यवसायास लाभ होत असल्याने वांद्रे-कुर्ला संकुलातील भूखंड देण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली. तसेच मुख्य सचिव व महानगर आयुक्त यांनी इंडियन न्यूज पेपर सोसायटीच्या प्रतिनिधींशी विचारविनिमय करुन सुधारीत व निश्चित स्वरुपाचा प्रस्ताव प्राधिकरणापुढे आणावा असे ठरविण्यात आले.

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

**********************

जोडपत्र

जोडपत्र

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची ९७ वी बैठक

दिनांक : १४ फेब्रुवारी, २०००

: ठराव :

प्रि.वामनराव शिवराम महाडीक, माजी आमदार व मुंबईचे माजी महापौर, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे दिनांक १२ ऑक्टोबर, १९९९ रोजी निधन झाले. श्री.महाडीक हे दिनांक ०१.०३.१९७५ ते दिनांक २९.१२.१९७६ या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष होते तसेच श्री.महाडीक हे दिनांक ०६.०४.१९७८ ते दिनांक २२.११.१९७८ या कालावधीत मुंबईचे महापौर हया नात्याने प्राधिकरणाचे उपाध्यक्ष होते. या काळात श्री.महाडीक यांनी प्राधिकरणाच्या कार्यात व कामकाजात आस्थेने भाग घेतला होता. हे प्राधिकरण, त्यांच्या दुःखद आणि आकस्मिक निधनाने फार मोठी हानी झाल्याचे अभिलिखित करीत आहे.

या ठरावाची प्रत दिवंगत श्री.महाडीक यांचे कुटुंबियांकडे पाठवून त्यांच्या दुःखात हे प्राधिकरण सहभागी आहे असे कळवावे.

***********************